**रयत शिक्षण संस्थेमध्ये पद्मश्री पोपटराव पवारांसारखे व्यक्तिमत्व घडविण्याची ताकद: चेअरमन चंद्रकांत दळवी.**

केडगाव प्रतिनिधी: रयत शिक्षण संस्थेमध्ये पद्मश्री पोपटराव पवार, उद्योजक राजेंद्रजी शिंदे, उद्योजक नरेंद्र फिरोदिया व माझ्यासारखे आय.ए.एस अधिकारी बनवण्याची ताकद आहे. असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी साहेब यांनी 136 व्या कर्मवीर जयंती सोहळयाच्या प्रमुख अतिथी पदावरून बोलताना व्यक्त केले. केडगाव येथील श्री अंबिका प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विज्ञान विद्यालयांमध्ये 136 वा कर्मवीर जयंती सोहळा वृक्षारोपण पारितोषिक वितरण अशा विविध उपक्रमांनी पार पडला. विविध शासकीय परीक्षा, क्रीडा स्पर्धा, शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर होते. अध्यक्षपदावरून बोलताना दादाभाऊ कळमकर यांनी विद्यालयाची गुणवत्ता व उत्तर विभाग रयत शिक्षण संस्थेची स्पर्धा परीक्षेतील उत्तुंग भरारी यावर मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी चेअरमन चंद्रकांत दळवी साहेब यांनी आपल्या मनोगतात कर्मवीर भाऊराव पाटलांचे बालपण, त्यांच्यावर असलेला राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा प्रभाव, रयत शिक्षण संस्थेची उभारणी, त्याचा विस्तार, कार्यकर्त्यांचे योगदान, त्याचप्रमाणे रयतेचा विद्यार्थी कसा असावा यावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर विविध कलागुणांची जोपासना करावी. कला,क्रीडा, वक्तृत्व अशा विविध क्षेत्रांमध्ये स्वतःचे व्यक्तिमत्व तपासावे. प्रत्येक स्पर्धेमध्ये भाग घ्यावा व ज्या क्षेत्रामध्ये आपले व्यक्तिमत्व अधिक प्रभावीपणे खुलत आहे ते ओळखून त्या दिशेने वाटचाल करावी असा विचार मांडला. शिक्षकांमध्ये विद्यार्थ्यांना सर्वगुणसंपन्न करण्याची ताकद आहे. शिक्षक हेच खरे विद्यार्थ्यांचे भविष्यनिर्माते आहेत. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल करावे असाही विचार त्यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केला. रयत शिक्षण संस्थेत शिकून मी आय.ए.एस पदापर्यंत पोहोचू शकलो. पद्मश्री पोपटराव पवारांसारखे अनेक व्यक्तिमत्व रयत शिक्षण संस्थेने वाढवले व घडवले. मोठे केले. याच रयत संस्थेमध्ये जे विद्यार्थी शिकत आहेत ते खरोखरच भाग्यवान आहेत असा मौलिक विचार चेअरमन चंद्रकांत दळवी साहेबांनी व्यक्त केला. पद्मश्री पोपटराव पवार यांनी आपल्या मनोगतात बोलताना रयत शिक्षण संस्थेत शिकून सामान्य शेतकरी कुटुंबातील चंद्रकांत दळवी हे आय.ए.एस पदापर्यंत पोहोचले. त्यांनी आपल्या शिक्षणाचा व अनुभवाचा उपयोग आपल्या मातृभूमीसाठी व रयत शिक्षण संस्था संस्थेसाठी केला. खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांनी चंद्रकांत दळवी यांच्यातील कर्तुत्व ओळखून चेअरमन पदाची जबाबदारी दिली. त्यांच्या चेअरमन पदाच्या काळात रयत शिक्षण संस्था उत्तुंग भरारी घेईल. असा विश्वास व्यक्त केला. उद्योजक नरेंद्रजी फिरोदिया यांनी विद्यार्थ्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. पी.आर.एम सॉफ्ट सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर तथा सीईओ राजेंद्र शिंदे साहेब यांनी माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात विद्यार्थ्यांनी ज्ञान आत्मसात करावे.पुढील भविष्य माहिती तंत्रज्ञानावर आधारित असेल असा विचार दिला. त्याचप्रमाणे राजेंद्र शिंदे साहेब यांनी विद्यालयाच्या नवीन इमारतीसाठी रुपये पाच लाख इतकी देणगी जाहीर केली. केडगाव चे युवा उद्योजक सचिन आबा कोतकर यांनी सर्व केडगाव वासियांच्या वतीने विद्यार्थ्यांना भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमासाठी विभागीय अधिकारी तुकाराम कन्हेरकर, उपविभागीय अधिकारी काकासाहेब वाळुंजकर, तापकीर, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, अशोक बाबर, पोकळे सर,नगरसेवक मनोज कोतकर, रावसाहेब सातपुते किसन सातपुते, गोविंद कोतकर, महेश गुंड, प्रशांत कोतकर रामदास येवले, रघुनाथ लोंढे पोपट शिंगवी, देशपांडे काका, कृष्णाजी थोरात, शिवाजी झावरे, गंगाधर लोंढे, तबाजी कापसे, अशोक झरेकर, शिवाजी लंके, बाबासाहेब वायकर, संजय निक्रड, पर्यवेक्षक पोपट घोडके, आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य अशोक शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब जगदाळे स्वाती औटी ,अरुणा दरेकर यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन रवी तंटक यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सिताराम जपकर, महेश ढगे, प्रदीप गारुडकर, संदीप गाडीलकर, अशोक बडवे, व विद्यालयातील सर्व सेवकांनी परिश्रम घेतले.








